Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 5.69
Online Available at www.cmrj.in
ISSN No. 2456-1665

# मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्या: कारणे व उपाय

.

**गणेश अर्जुन खळेकर**
संशोधक

**डॉ. तुकाराम दत्तात्रय गजर**
मार्गदर्शक

**प्रस्तावना:-**

शेती ही भारतीय अर्थव्यवस्थेचा मुलभुत आधार असुन शेतकरी हा तिचा केंद्रबिंदु आहे. परंतु सध्याच्या बदलत्या सामाजिक, आर्थिक व नैसर्गिक परिस्थिमध्ये शेतकऱ्यांचे जीवन अधिक कठीण होत चालले आहे. शेती करत असतसंना शेतकऱ्यांला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. विशेषत: महाराष्ट्रातील मराठवाडा व विदर्भ यांसारख्या भागामध्ये शेतीतील असुरक्षिता, कर्जाचा वाढता बोजा, नापिकी, शासकीय योजनाची अपयशी अंमलबजावणी या बरोबर पीकावर पडणारी विविध नैसर्गिक किड त्यांचा उत्पादनावर होणारा परिणाम कुटुंबातील प्रमुख असल्याने शेतकऱ्याला या सर्व गोष्टींचा मानसिक ताण सहन करावा लागतो. या अनेक समस्यांमुळे शेतकऱ्याला आत्महत्या करण्या सारखे टोकाचे पाऊल उचलावे लागत आहे.

भारत देश हा कृषी प्रधान राष्ट्र आहे. देशातील सुमारे 70% लोक मुख्यत: शेती व्यवसाय करतात किंवा त्यासंबंधीत व्यवसायाशी निगडीत आहेत. एका अर्थाने भारतीय अर्थव्यवस्थाही कृषीवरच अवलंबुन आहे. भारत देशाची आजही शेती मान्सुनवरच अवलंबुन आहे. मान्सुनचा सुध्दा भारतीय कृषी व्यवसायावर मोठा परिणाम झालेला दिसुन येतो. अनेक समस्यांना तोंड देता देशातील शेतकरी हा शेती करतांना दिसुन येतो. या सर्व गोष्टींना समोर जाण्यासाठी शेतीला अनेक उपाय पण आहे. देशातील व राज्यातील शेतकरी एकच पीक पध्दती अवलंबित असतो. त्यामुळे शेतीमधुन जास्तीच उत्पादन मिळत नाही. सर्व प्रथम प्रत्येक शेतकऱ्यांनी पीक घेतांनी वेगवेगळी होण्याचा प्रयत्न करावा. त्यामधुन जास्तीचा नफा उत्पादन मिळण्याची शक्यता असते. शेती बरोबर जोड व्यवसाय करावा. त्यापासुन सध्दा कृषी व्यवसायात मदत मिळते. नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करावा. शेती करतांना प्रत्येक शेतकऱ्यांने आपल्या शेतीवरील खर्च वजा जाता उत्पादन किती मिळते याचा चोख हिशोब ठेवायला पाहिजे. यामुळे शेतकऱ्याला लागवडी पासुन कापणी पर्यंत येणारा खर्च शेतकऱ्यांनी लेखी स्वरुपात ठेवणे गरजेचे आहे. त्याचबरोबर आपल्या हवामानानुसार पिके घेण्याचा प्रयत्न करणे. त्यामुळे उत्पादनावर त्याचा परिणाम होणार नाही. देशांतील व राज्यातील सरकारने शासन स्तरावर पिकाला योग्य भाव देणे, अनेक योजना,

सवलती, विमा योजना आणि अनुदान जाहीर करावे आणि या सर्व बाबींची प्रभावीपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे. शासनाचा या विषयाचा लक्ष देण्याची गरज आहे.

**उद्दिष्ट्ये:-**

- शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी संभाव्य उपयोजनाची चर्चा करणे
- शेतकरी आत्महत्या करण्यामागील कारणे
- मराठवाड्यातील शेतकरी आत्महत्याचे वाढते प्रमाण व लक्ष

**शेतकरी आत्महत्येचे स्वरुप :-**

देशातील व राज्यातील शेतकरी आत्महत्याचे वाढते प्रमाण खुप मोठे आहे. तसे पाहता मराठवाड्यातही शेतकऱ्यांच्या आत्महत्या मोठ्या प्रमाणावर झालेल्या आहेत. 2001 ते 2024 पर्यंत मराठवाड्यात 11,518 शेतकऱ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत. या आकडेवारीत मोठ्या प्रमाणात वाढ होतांना दिसुन येत आहे. मराठवाडा प्रशासकीय विभागामध्ये प्रत्येक जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयातील नैसर्गिक आपत्ती विभागातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांची आकडेवारी माहिती अधिकाराने 2001 ते 2020 पर्यंत मिळवली आहे. ती खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | जिल्हा | आत्महत्या ग्रस्त शेतकरी |
|---|---|---|
| 1 | जालना | 871 |
| 2 | छत्रपती संभाजीनगर | 1010 |
| 3 | परभणी | 914 |
| 4 | धाराशिव | 1174 |
| 5 | लातुर | 771 |
| 6 | हिंगोली | 417 |
| 7 | बीड | 793 |
| 8 | नांदेड | 147 |
| **एकुण** | | **6097** |

(माहितीच्या अधिकाराने मिळवलेली आकडेवारी 2001-2020)

मराठवाड्यातील 10 वर्षामध्ये 6097 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन यामध्ये वाढ झालेली दिसुन येते. या आकडेवारी वरुन सरासरी मराठवाड्यातील 8 जिल्ह्यामध्ये वर्षाला सरासरी 609 शेतकरी आत्महत्या करत आहेत.

**सद्यस्थितीत मागील 2023-2024 मधील आत्महत्या ग्रस्त आकडेवारी**

| अ.क्र. | जिल्हा | आत्महत्या ग्रस्त शेतकरी वर्ष 2023 | आत्महत्या ग्रस्त शेतकरी वर्ष 2024 |
|---|---|---|---|
| 1 | जालना | 74 | 76 |
| 2 | छत्रपती संभाजीनगर | 182 | 132 |
| 3 | परभणी | 103 | 64 |
| 4 | धाराशिव | 171 | 143 |
| 5 | लातुर | 72 | 72 |
| 6 | हिंगोली | 42 | 29 |
| 7 | बीड | 269 | 160 |
| 8 | नांदेड | 175 | 146 |
| **एकुण** | | **1088** | **822** |

(www.ndtv.com 2023-24 farmer suicide report)

वरील आकडेवारी वरुन असे दिसुन येते की, मराठवाड्यातील काही जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणावर आत्महत्या होत असुन बीड जिल्ह्यामध्ये सर्वाधिक आत्महत्या होत आहे. वार्षिक सरासरीच्या आधारे 2023 मध्ये मराठवाड्यातील 8 जिल्ह्यामध्ये सरासरी महिन्याला 90 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहे. तसेच 2024 मध्ये सुध्दा सरासरी महिन्याला 68 शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत.

**शेतकरी आत्महत्या करण्यामागील कारणे :-**

**1) कृषी धोरणाचा अभाव :**

देशाचा योग्य कृषी क्षेत्रात सर्व समावेशक धोरणाचा आभाव आहे. पीक नियोजन करणे, पिकांना योग्य भाव, योग्य तंत्रज्ञान, भांडवलाचा पुरवठा, बाजारपेठ, शेतमालाच्या वस्तूंची निर्यात इत्यादीची व्यवस्था मजबूत करणारे सर्व समावेशक कृषी धोरण आखून त्याची प्रभावीपणे कार्यवाही करणे नितांत गरजेचे आहे. याशिवाय भाववाढीमुळे शेतक-यांची आर्थिक स्थिती वाईट बनते. कौटूंबिक कलह व संघर्ष, मुला-मुलींच्या लग्नाचा वाढता खर्च, आरोग्य विषयक समस्या व व्यसनाधीनता इत्यादी कारणे ही शेतक-यांच्या आत्महत्येस जबाबदार आहेत.

**2) कृषीवर अवलंबून असणाऱ्याची संख्या जास्त :**

भारत देशात व महाराष्ट्र राज्य मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या वाढीमुळे जमीनीचे अनेक लहान लहान भागात विभागणी झालेली आहे. परिणामी ते या लहान लहान शेती करण्यास व शेतीसाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरण्यास फारसे फायदेशीर ठरत नाही. परिणामी उत्पन्न स्थिर राहते.

**3) शेतमालाच्या किंमतीत चढ उतार :-**

अत्यंत कमी भाव पिकांना असल्यामुळे शेतीतुन खर्च सुध्दा निघत नाही. शेतकरी वर्ग अडचणीत सापडतो. गोदामाच्या पुरेशा सोयी उपलब्ध नसल्याने शेतकऱ्याला माल विक्री करण्याची घाई करावी लागते. अर्थात मिळेल त्या दराने शेतमालाची विक्री केली जात असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान होते. बाजारात शेतमालाचा भाव कधी वधारतो तर कधी घसरतो. शेतमालाचा भाव जेव्हा वाढतो तेव्हा त्याचा फायदा प्रामुख्याने बाजारातील व्यापाऱ्यांना व दलालांना होतो. शेतकरी वर्ग अशा लाभांपासून वंचित राहतो. शेतमालाचे भाव जेव्हा घसरतात तेव्हा त्याचा फटका मात्र शेतकऱ्यांना बसतो. शेतमालाच्या किंमतीच्या चढउतारामुळे शेवटी शेतकऱ्यांचे नुकसान होत असते.

**4) अनियमित पाऊस :-**

शेतीसाठी पाणी अत्यंत आवश्यक आहे. भारत देशातील शेती मान्सुनवर खुप मोठ्या प्रमाणावर अवलंबुन आहे. मान्सुनचा सुध्दा भारतीय अर्थव्यवस्थावर झालेला परिणाम आपणास दिसुन येतो. शेतीसाठी कायमस्वरूपाच्या पाण्याची गरज असते. पण भारतातील सद्यपरिस्थिती कायम स्वरूपी पाणी उपलब्ध नाही. परिणामी पाण्याअभावी शेती उत्पादन वाढत नाही. अपुऱ्या सिंचन सुविधा हे ही शेतकऱ्यांना आत्महत्येस जबाबदार आहे. महाराष्ट्रातील सरासरी सिंचन ११ टक्के इतके आहे.

**5) वीजेची समस्या :-**

शेतकऱ्यांना शेतीस पाणी देण्यासाठी विजेची खुप गरज असते वीज नसेल तर पाणी असुन सुध्दा शेतकऱ्यांना शेतीला पाणी देता येत नाही.

**6) रूढी, परंपरा व सामाजिक प्रथांचा प्रभाव :-**

शेतकरी वर्गावर रूढी, परंपरा व प्रथांचा प्रभाव आहे. रूढी व परंपरेचे पालन करण्यासाठी तो अडचणीत असूनही पैसे खर्च करतो. धार्मिक विधी, घरगुती समारंभ वा इतर प्रथांचे पालन करण्यासाठी प्रसंगी तो कर्ज ही काढतो. काही वेळा शेतीसाठी काढलेली कर्जे अशा अनुत्पादक बाबींवर तो खर्च करतो. यामुळे कर्जाच्या परतफेडीच्या वेळी अडचणी निर्माण होतात. शेतकऱ्यांवरील कर्जाचा डोंगर वाढत जाउन त्यांच्यात आत्महत्येची मानसिकता निर्माण होते.

**7) व्यवसाय शिक्षणाचा अभाव :-**

देशातील व महाराष्ट्रातील शेतकरी हा परंपरागत पध्दतीने शेती करतो. बहुतांश शेतकरी हे कमी शिक्षण घेतलेले आहेत. जे थोडे शिकलेले आहेत ते ही शेतीचे अर्थशास्त्र व्यवस्थापन यापासून दूरच राहिलेले आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना कमी खर्चात जास्त उत्पन्न होण्याच्या पध्दती शिक्षण मिळालेले नसते. परिणामी शेतकरी तोट्यात जातो.

**8) शासनाचे धोरण :-**

शासनाचे काही निर्णय असे आहेत की जे शेतकऱ्याला आत्महत्या केल्यानंतर 1 लाखाची मदत दिल्या जाते. शासनाची धोरणे ही शेतकऱ्यांना प्रत्यक्ष मदत करणारी नसतात. शासनाची धोरणे ही फक्त कागदावरच असतात ते प्रत्यक्ष समस्या सोडवण्यात लक्ष घालतात असे नाही. धोरणे राबवली तरी ती वेळ गेल्यानंतर शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाहीत. उदा :- शेतकऱ्यांचे नुकसान होऊन सुध्दा विमा कंपण्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाईचा विमा देत नाही.

**<u>शेतकऱ्यांच्या आत्महत्येची कारणे :-</u>**

**1) वाढता कर्जबाजारीपणा :-**

वाढता कर्जबाजारीपणा हे आत्महत्येचे प्रमुख कारण आहे. शेती क्षेत्राला सवलतीच्या दराने होणारा वित्तपुरवठा अद्यापही अपुरा आहे. स्वातंत्र्योत्तर काळात राष्ट्रीयकृत बँका व वित्तीय संस्थांनी शेतकऱ्यांना सुलभ कर्ज पुरवठा करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु अजुनही दूरवर पसरलेल्या सर्व खेडयांतील शेतकऱ्यांपर्यंत हा कर्ज पुरवठा पोहोचलेला नाही. यामुळे शेतकऱ्यांना खाजगी सावकारांकडून कर्जे घेण्याचा मार्ग पत्करावा लागतो. अवाजवी व्याज दरामुळे अशी कर्जे घेणे शेतकऱ्यांना परवडत नाही तो कर्जाच्या सापळयात अडकून पडतो. सहकारी पतपुरवठा संस्था व इतर बँकाकडून कर्जे मिळाली तरी शेतकऱ्याने ती कर्जाची रक्कम गुंतविल्यानंतरही उत्पान्नाची हमी नसते. अनियमित पाउस, हवामानातील बदल, कीड व किटकांचा प्रादूर्भाव इत्यादी कारणामुळे पिके हाती येतीलच असे नाही. अशा स्थितीत कर्जाचे हप्ते वेळेवर भरता येत नाहीत. मुद्दल व व्याज यांच्या रक्कमा थकीत होतात. हप्ते वेळेवर न भरल्याने बऱ्याचदा शेतकऱ्यांना व्याजावर व्याज द्यावे लागते. यातून त्यांचा कर्जबाजारीपणा वाढतो. अशा सततच्या कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकरी आत्महत्या करतात.

**<u>शेतकऱ्यांच्या आत्महत्येवरील उपाय :-</u>**

**<u>शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्यासाठी निरनिराळे उपाय प्रभावीपणे योजण्याची गरज आहे.</u>**

**1) अल्पदराने कर्जपुरवठा :- व जास्त प्रमाणात मिळावे**

शेतकऱ्यांमधील कर्जबाजारीपणा कमी करण्यासाठी त्यांना अल्प वा सवलतीच्या दराने कर्जपुरवठा होणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांची सावकारी पाशातून मुक्तता करण्यासाठी व निसर्गाने दगा दिल्याने झालेले नुकसान भरून काढण्यासाठी कमी दराने कर्जपुरवठा होण्याची आवश्यकता आहे. तसेच शेतकऱ्यांना विगर कृषी कारणांसाठीही कर्जपुरवठा झाला पाहिजे. जेणेकरून ते बिगर कृषी वा उपभोग्य कर्जासाठी सावकाराचा मार्ग धरणार नाहीत आणि त्यांचा कर्जबाजारीपणा कमी होउन आत्महत्येचे प्रमाण कमी राहिल.

**2) आकस्मिक निधी :-**

अतिवृष्टी, महापूर, हवामानातील बदल इत्यादी नैसर्गिक घटकांवर शेतकऱ्यांचे होणारे नुकसान भरून काढण्यासाठी आकस्मीक निधी उभारला पाहिजे. बँका वित्तीय संस्था, राज्य सरकार व केंद्र सरकारने यात योगदान द्यावे या निधीमुळे शेतकऱ्याचा कर्जबाजारीपणा कमी होईल.

**3) विपणन व्यवस्था :-**

शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी सर्वप्रथम विपणन व्यवस्था भक्कम केली पाहिजे, विपणन व्यवस्थेतील शेतकऱ्यांचे स्थान मजबूत केले पाहिजे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळाला पाहिजे. बाजारात शेतमालाचे भाव बऱ्यापैकी असतात. परंतु त्या किंमतीतील शेतकऱ्यांचा हिस्सा खूपच कमी असतो बाजारातील दलाल, व्यापारी व अडते या मध्यस्थांचा बाजारात सहभाग असल्याने शेतकऱ्यांच्या मालाला अल्पभाव मिळतो. यासाठी शेतमालाला उत्पादन खर्चावर आधारित भाव मिळतील अशी व्यवस्था केली पाहिजे.

माहिती देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यासाठी वेबसाईट निर्माण केल्या आहेत. कृषी मालाची मागणी, विविध प्रकारच्या कृषी मालाचे उत्पादन, स्थानिक हवामानाची स्थिती, हवामानाबाबतचा अंदाज, नवीन कृषी तंत्रज्ञान, कृक्षी मालाचे चालू बाजारभाव इत्यादी स्वरूपाची माहिती वेबसाईटव्दारे उपलब्ध करून दिली जाते. आतापर्यंत ITC या संस्थेने ५५०० ई-चौपालांची स्थापना केली आहे.

**4) कंत्राटी शेतीला उत्तेजन :-**

शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्यासाठी कंत्राटी शेतीला उत्तेजन दिले पाहिजे. शेतमालाचा उत्पादक आणि खरेदीदार यांच्यामध्ये कराराप्रमाणे उत्पादन व पुरवठा करण्याची व्यवस्था म्हणजे कंत्राटी शेती होय. कंत्राटी शेतीमुळे शेतकऱ्यांना उत्पादन तंत्र, खते, बियाणे आदींचा पुरवठा व इतर मार्गदर्शन प्राप्त होते. तसेच खरेदीदाराला दर्जेदार उत्पादन मिळविता येते. पंजाबमध्ये कंत्राटी शेतीमुळे शेतीची प्रति हेक्टरी उत्पादन क्षमता २५ ते ४० टक्यांनी वाढल्याचे आढळून आले आहे.

**5) व्यवसाय शिक्षणाची व्यवस्था करावी.:-**

शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शेती शाळा चालु कराव्यात. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेतीचे व्यवस्थापन, नियोजन व बाजारपेठ माल टिकण्याच्या पध्दतीचे ज्ञान देणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे प्राथमिक स्तरापासूनच कृषी हया विषयाचा अभ्यासक्रमात समावेश करावा व पीकलेल्या मालाला योग्य भाव कसा मिळवता येईल याचे मार्गदर्शन करावे.

**6) डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांचे उपाय :-**

राष्ट्रीय शेतकरी आयोगाचे अध्यक्ष डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांनी शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबविण्यासाठी काही उपाय सुचविले आहेत. कापसावरील आयात शुल्कात वाढ करावी, कापासावर आगाउ बोनस देण्यात यावा. किंमत स्थिरीकरण निधी स्थापन करण्यात यावा. जमिनीतील पाण्याचे

पुनर्भरण सक्तीचे करावे. कृषी कर्जावरील व्याजदर ४ टक्क्यांपर्यंत कमी करावे, विपणनासाठी आधारभूत संरचनेकरिता पत पुरवठा करण्यावर भर द्यावा, स्वयं सहाय्यता गटांची प्रगती साधणे, किसान कॉल सेंटरची गरज पटवून देणे यासारखे उपाय डॉ. एम. एस. स्वामीनाथन यांनी सुचविले आहेत.

**7) सिंचनाच्या सोयीत वाढ करणे :-**

शेतीसाठी सिंचन व्यवस्था ही चांगली असणे खुप गरजेचे आहे. सिंचनसोई अपुऱ्या असल्याने शेतीची उत्पादकता कमी राहते. शेतकऱ्यांचे उत्पन्न मर्यादित राहून आर्थिक समस्यांना त्याला तोंड द्यावे लागले. भारतातील ४० टक्के क्षेत्र सिंचनाखाली आहे तर महाराष्ट्रभर हे प्रमाण जवळपास १६ टक्के इतके आहे म्हणजेच राज्यातील बारमाही पाणी पुरवठयाखालील जमीन वाढविण्यासाठी गरज आहे. जमिनीतील पाण्याचे पुनर्भरण करण्यावर भर दिला पाहिजे. सामान्यपणे ठिबक सिंचनामुळे 60 ते 65 टक्के व तुषार सिंचनामुळे ३० ते ३५ टक्के पाणी वापराची बचत होते. शेतकऱ्यांना जल व्यवस्थापनाचे प्रशिक्षण दिले पाहिजे. तसेच स्वस्त अखंड व पुरोसा वीज पुरवठा उपलब्ध होण्याची गरज आहे.

**8) समुपदेशन केंद्राची आवश्यकता**

शेतकऱ्यांची आत्महत्या करण्या मागची कारणे अनेक आहेत. काही कारणे असे आहेत की शेतकऱ्यांच्या आत्महत्या होण्यापासुन त्यांना थांबवता सुध्दा येऊ शकते. शेतक-यांच्या आत्महत्या मानसिक दुर्बलतेतूनही होत असल्याचे मत अनेक विचारवंतांनी मांडले आहे. भारतात 40 टक्के तर महाराष्ट्रात 16 टक्के क्षेत्र सिंचनाखाली आहे. अलिकडिल काळात शेतीकरणे परवडत नाही व शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रत्येक गावात एक समुपदोन केंद्र चालवण्याची आव" यकता आहे. शेतक-यांचा कर्जबाजारीपणा, दारीद्रय व निसर्गाचा फटक इत्यादी कारणांनी शेतकरी अडचणीत सापडलेला आहे शेतक-याला या समस्येतून बाहेर काढण्यासाठी सल्ला, मार्गदर्शन व मानसीक आधाराची गरज आहे.

**9) शून्य आत्महत्या अभियान**

देशातील व राज्यातील शेतकऱ्यांच्या वाढत्या आत्महत्या रोखण्यासाठी शासनाने याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. अवकाळी पाउस शेतीला होणारा मर्यादित अर्थपुरवठा, बाजारात कृषी विषयक उत्पादनांवर मिळणारा कमीभाव या सर्व बाबींचा विचार करीत शेतक-यांचे प्र"न सोडविण्यासाठी भूमिका "शासनाने मांडली. शेतक-यांच्या आत्महत्या हा महाराष्ट्रासाठी कलंक आहे तेव्हा समस्याग्रस्त शेतक-यांना दिलासा देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने 14 एप्रिल 2015 रोजी शून्य आत्महत्या अभियानाची घोषणा केली.

10) सर्वात महत्वाची उपाय योजना म्हणजे एखादा शेतकरी कर्जबाजारी झाला असेल तर समाजाने त्यांना सामाजिक, मानसिक व आर्थिक मदत दयावी. जेणे करुन तो आत्महत्येचा अविचार करणार नाही. याकरिता समाजाने योग्य ते प्रयत्न केले पाहिजे.

**समारोप :-**

शेतकरी आत्महत्याचे वाढते प्रमाण याकडे शासनाने लक्ष देण्याची खुप गरज आहे. कारण देशातील व राज्यातील शेतकरी वाचला पाहिजे. शेतकऱ्याचे शोषण करणे थांबले पाहिजे. शेतकऱ्यांचे शोषण करणाऱ्यांवर कशी वचक बसवता येईल याकडे शासनाने लक्ष देणे काळाची गरज आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येला त्यांचा कर्जबाजारीपणा प्रामुख्याने जबाबदार आहे. शेतकऱ्यांचे दारिद्रय, पर्यायी रोजगाराचा अभाव, शेतीचे पावसावरील अवलंबित्व, सावकारी कर्जाचा अवाजवी व्याजदर, बँकांकडून कर्ज वसूलीसाठी आपणला जाणारा दबाव ही सर्व कारणे प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे शेतकऱ्यांच्या कर्जबाजारीपणाशी निगडित आहेत. म्हणून शेतकऱ्यांचा कर्ज बाजारीपणा कमी करण्यासाठी प्रयत्न करण्याची नितांत आवश्यकता आहे. त्यासाठी सरसकट कर्जमाफी न देता शून्य व्याजदराने पुरेसे कर्ज वितरित करावे. नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान द्यावे. शेतकऱ्यांच्या शेतमालाला हमीभाव वाटून द्यावा. यातून कर्जबाजारीपणा कमी होईल व आत्महत्येचे प्रमाणकमी होईल.

- **संदर्भ:-**


  - कृषी क्षेत्रातील पेच प्रचंग आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या :- डॉ. सतिश गव्हाणे (चिन्मय प्रकाशन छत्रपती संभाजीनगर)
  - शेतकरी आत्महत्या, :- समस्या आणि उपाय :- डॉ. विनायक शिंदे
  - कृषी भूगोल :- डॉ. विजया सोळुंके (आवृत्ती 2015- डायमंड पब्लिकेशन पुणे)
  - लोकसत्ता वृत्तपत्र / दैनिक (17 मार्च 2024, 29 एप्रिल 2024, 06 नोव्हेंबर 2024)
  - महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या :- कारणे व उपाय :- प्रा. डॉ. सुदाम कडुजी कोरडे
  - Wikipedia- https://en.wikipedia.org/wiki/Farmers'_suicides_in_India
  - www.ndtv.com 2023-24 farmer suicide report